**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांच्या महाराष्ट्र राज्यातील नवघर, ता.वसई ते चिरनेर, ता.उरण (जेएनपीटी जवळ) टप्पा-१ (लांबी ८० किमी) प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पाच्या विकासाकरिता दि.१५ डिसेंबर २०२१ रोजीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांच्या महाराष्ट्र राज्यातील नवघर ते चिरनेर टप्पा-१ (लांबी ८० किमी) प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पाच्या विकासाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी दुपारी १२.० वाजता श्री वरद सिद्धीविनायक सेवा मंडळ, सिद्धिविनायक नगर, भोपर रोड, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व - ४२१२०४ येथे आयोजित करण्यात आली होती.

सदरची जनसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयीन आदेश क्रमांक E-117/2021 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B_211209_FTS_0019 dated ०९/१२/२०२१ च्या अन्वये खालील अधिका-यांना जनसुनावणी पॅनेल सदस्य म्हणून नेमण्यात आले होते.

| | |
|---|---|
| १) श्री. अभिजीत भांडे पाटील,<br>उप विभागिय दंडाधिकारी, कल्याण | अध्यक्ष |
| २) श्री. शंकर वाघमारे<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण | सदस्य |
| ३) श्री. संजय भोसले, उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-१<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | निमंत्रक |
| ४) श्रीमती. सौजन्या पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | निमंत्रक |

श्रीमती सौजन्या पाटील, निमंत्रक यांनी माननीय अध्यक्ष, सदस्य जनसुनावणी पॅनल, लोकप्रतिनिधी उपस्थित स्थानिक नागरिक यांचे स्वागत करून त्यांनी सदर जन सुनावणी ही इ आय ए अधिसूचना २००६ नुसार हा प्रकल्प वर्ग "अ" अंतर्गत येत असुन पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (एम ओ ई एफ सी सी) भारत सरकार कडून पूर्व पर्यावरण मंजुरी आवश्यक आहे. उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी, म.प्र.नि. मंडळ यांचेकडे सदरच्या नियोजित प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडुन प्राप्त झाला. त्यानुसार (इ आय ए) अधिसूचना २००६ प्रकल्प वर्ग "अ" अंर्तभुत असल्यामुळे जन सुनावणी घेणे व हा प्रकल्प ज्या मार्गातून जातो तेथील स्थानिक नागरिक, शेतकरी यांना सदर प्रकल्पाची विस्तृत माहिती देण्यासाठी, ही जन सुनावणी आयोजित करण्यात आली आहे, असे सुचित केले. त्यांनी पुढे अशी ही माहिती दिली की, सदरचा प्रकल्प वर्ग "अ" अंतर्गत आहे. तसेच वन क्षेत्र बाधित होत असल्यामुळे वन विभागाची संमती घेणे अनिर्वाय आहे. सदरचा विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्प हा भिवंडी, कल्याण व अंबरनाथ या तालुक्यांमधुन जात आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (एम ओ ई एफ सी सी)

यांच्या १४१ व्या बैठकिमध्ये संदर्भ अटीना(टी ओ आर) मंजुरी देण्यात आली. तथापी सदर प्रस्तावाच्या संरेखनात बदल झाल्यामुळे सुधारीत टी ओ आर दिनांक ०३/०६/२०१९ रोजी पून:श्च सादर करण्यात आला. त्यानुसार एम ओ ई एफ सी सी यांचेकडून दि.१८/०७/२०१९ रोजी संदर्भ अटी (टी ओ आर) नव्याने निर्गमित करण्यात आल्या. दि.०७/०७/२०२० रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकित सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर प्रकल्प प्रस्तावातील बदलाकरीता सुधारित टी ओ आरला एम ओ ई एफ सी सी चे दि. १८/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये टी ओ आर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत केला.

तदनंतर म.रा.र.वि.महामंडळ प्रकल्प प्रस्तावक यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन (ई आय ए) अहवाल तयार केला. ई आय ए अधिसुचनेनुसार सुनावणीच्या एक महिन्याआधी जाहिर नोटीस मराठी दै. सकाळ व इंग्रजी दै. इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रामध्ये दि. १३/११/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकनाच्या (ई आय ए) व कार्यकारी सारांश प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आल्या.

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
२. उप विभागीय दंडाधिकारी, ठाणे
३. मुख्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
४. उप विभागीय अधिकारी, भिवंडी, कल्याण व अंबरनाथ
५. प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, कल्याण
६. उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, कल्याण-१, कल्याण-२ व भिवंडी
७. मुख्यालय, मप्रनि मंडळ, सायन, मुंबई
८. जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे
९. ग्राम पंचायत कार्यालय, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ तहसिल क्षेत्र
१०. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन

तसेच वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात आले की सदर प्रस्तावा संदर्भात नागरीकांनी , त्यांनी आपल्या सुचना, हरकती लेखी स्वरुपात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात याव्यात. श्रीमती. पाटील यांनी जनसुनावणीच्या अध्यक्षांना जनसुनावणीची प्रक्रिया सुरु करण्यास संमती देण्यासाठी विनंती केली.

श्री. अभिजीत भांडे पाटील, उप विभागिय दंडाधिकारी आणि अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी सर्वांचे स्वागत करुन प्रकल्प प्रस्तावक यांना प्रकल्पाच्या संबंधी सविस्तर माहिती आणि पर्यावरण संरक्षण संदर्भात करण्यात येणारी उपायोजना त्या संबंधी मराठी भाषेत विषद करावी अश्या सुचना दिल्या,

श्री. डी.एम. गोडबोले, अभियंता, लुईस बर्जर, पर्यावरणीय सल्लागार, म.रा.र.वि.महामंडळ यांनी प्रकल्पा संदर्भात सादरीकरण केले. श्री. डी.एम. गोडबोले यांनी प्रस्तावित प्रकल्पाची आवश्यकता विषद करताना मुंबई महानगर प्रदेश हा वेगात वाढणारा नागरी प्रदेश असुन सध्या उपलब्ध असलेल्या सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर येणारा ताण तसेच झपाटयाने होणारे नागरीकरण यामुळे विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पासारख्या

सुविधा अत्यंत गरजेच्या असल्याचे अधोरेखित केले. सदर प्रस्तावाचे काम हे दोन टप्प्यामध्ये प्रस्तावित आहेत. टप्पा-१ नवघर ते बलावली अंदाजे लांबी ९८.५०० कि.मी., टप्पा-२ बलावली ते अलिबाग अंदाजे लांबी २९.९०० कि.मी.

म.रा.र.वि.महामंडळाने टप्पा-१ मधील नवघर ते चिरनेर यासाठी पर्यावरण मंजुरी व सीआरझेड मंजुरी प्राप्त करण्यासाठी प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी शासन निर्णय दि. ०६/०९/२०२१ अन्वये नवघर ते बलावली हा प्रकल्प म.रा.र.वि.महामंडळाकडे हस्तांतरीत झाल्यामुळे या प्रकल्पाकरीता महामंडळास प्रकल्प अंमलबजावणी संस्था व प्रकल्पाचे उद्योजक म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच म.रा.र.वि.महामंडळ यांना भुसंपादन करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जेएनपीटी, सिडको, एमआयडीसी, एमएचएआय यांचा सहभाग उपलब्ध करुन देण्यासाठी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठित करण्यात आली आहे.

सदरचा प्रकल्प हा ८० कि.मी. लांबीचा असुन हा पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यातील वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण या तालुक्यातील एकून १०६ गावांमधुन प्रस्तावित आहे. त्यांनी पुढे असेही विषद केले की, प्रस्तावित मार्गिका ही जेएनपीटी, नवी मुंबई विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बरलींकला जोडणार आहे. तसेच विविध महामार्ग, एक्सप्रेसवे व राष्ट्रीय महामार्गास जोडण्यासाठी नऊ ठिकाणी इंटरचेंज प्रस्तावित आहे. हा मार्ग शिघ्र संचार द्रुतगती महामार्ग असणार आहे.

त्यांनी पुढे असे विषद केले की, सदरच्या विरारअलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पामुळे वसई, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल, उरण आणि तळोजा येथील औद्योगिक केंद्रांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल व शहरातंर्गत वाहतुकीमध्ये सुधारणा होईल. तसेच रोजगार निर्मिती, प्रदुषण नियंत्रण, इंधन बचत, वाहतुककोंडी यामुळे जिवनमान सुधारण्यास मदत होईल. सदर विरारअलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पांतर्गत ठिकठिकाणी दुरध्वनी व्यवस्था, वाहन व ट्रक यांच्यासाठी स्वतंत्र वाहन तळ, रुग्णवाहीका, ठराविक अंतरावर प्रवासी सुविधा केंद्र, पेट्रोल, डिझेल, सीएनजी तसेच इलेक्ट्रिकल चार्जिंग सुविधा रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष संवर्धन, सौर पथदिवे, सीसीटीव्ही, वाहतुक व्यवस्था प्रणाली, अडथळा विरहीत पथकर नाके इ. सोयी प्रस्तावित आहेत.

सदरचा प्रकल्प हा वन विभाग, रेल्वे विभाग, शासकिय जमिनी, शेत जमिनी, पक्षी अभयारण्य, वन्य जीव अभयारण्य, खारफुटी क्षेत्र इ. क्षेत्रातुन जात आहे. यासाठी सर्व संबंधीत शासकीय प्राधिकरणांकडुन आवश्यक ती परवानगी घेण्यात येईल. तसेच बांधकाम कालावधीत सदरील मंजुरीच्या अटींचे पालन केले जाईल व भुसंपादनासाठी योग्य तो मोबदला देण्याची तरतुद करण्यात येईल. सदरच्या प्रकल्पासाठी सुमारे १३४७ हेक्टर जमिन संपादित करावी लागणार आहे. त्यापैकी अंदाजे ७०० हेक्टर शेत जमिन व अंदाजे २२४.२४ हेक्टर इतकी वन जमिन संपादित करावी लागणार आहे.

सदरचा प्रकल्प ज्या क्षेत्रातुन जात आहे तेथील जमिन, माती व पाण्याची गुणवत्ता याचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. बांधकामादरम्यान, बांधकाम वाहने व उपकरणांमुळे होणाऱ्या धुळ व वायु प्रदुषण संदर्भात सीपीसीबी च्या मानकांची पुर्तता करण्यात येईल,ध्वनी नियंत्रणासाठी दगडी भिंत, ध्वनी नियंत्रण यंत्रणा इ. सारखे संरक्षक उपाय योजले जातील. तसेच भुगर्भातील पाणी व इतर जलाशयातील पाण्याची तपासणी नियमित केली जाईल व त्याची गुणवत्ता राखली जाईल. पर्यावरण निरीक्षण व संरक्षणासाठी प्रकल्प प्रस्तावकाने सुमारे रु.१० कोटी रुपयाची आर्थिक तरतुद केलेली आहे.

श्रीमती. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी यांनी उपस्थितांना त्यांच्या सुचना/हरकती/तक्रारी मांडण्याची विनंती केली.

| अ.क्र. | प्रश्नकर्त्याचे नाव, पत्ता व व्यक्त केलेले मत | प्रकल्प प्रवर्तकाचा अभिप्राय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **श्री. गजानन पाटील प्रपोज्ड मल्टी मोडल कॉरिडॉर संबंधात श्री गजानन पाटील मौजे कटाई** यांनी सर्व उपस्थीयांचे स्वागत केले व मी सर्वपक्षीय युवा संघटनेचा प्रमुख असून मी सुद्धा प्रकल्प बाधित शेतकरी आहे असे विदित केले. श्री पाटील यांनी त्यांचे लिखित निवेदन वाचून दाखवले, त्यांनी नवघर ते चिरनेर म्हणजेच प्रस्तावित विरार अलिबाग कॉरीडोर प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजीच्या अधिसूचने नुसार, परिसरातील वन्य प्राणी, झाडे,धरण यावर होणारा परिणाम यासाठी एन्विरॉन्मेंटल इम्पॅक्ट असेसमेंट करण्यात यावे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी झाली तर जागतिक तापमानात वाढ होईल असे विदित केले. "मौजे उंबरले" हे गाव ऑक्सिजन झोन म्हणून प्रसिद्ध आहे. सदर परिसरात कावळ्यां व्यतिरिक्त ११३ प्रकारचे पक्षी, सरपटणारे प्राणी मोठ्या प्रमाणात आढळतात. सदर परिसरात वन विभागाच्या २०० एकर जमिनीवर मोठी वनसंपदा आहे. या प्रकल्पातील एक गाव कुशीवली हे श्री मलंग गडाच्या पायथ्याशी असून येथे कुशीवली धरण प्रस्तावित आहे. सदर धरण बांधून झाल्यावर येथील शेतकरी वर्षभर २ पिके तसेच भाजीपाला इत्यादीची लागवड करू शकतील. सदर प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या उदर निर्वाहाची साधने बाधित होणार नाहीत याची शहानिशा व्हावी. मुळात सदर प्रकल्पाला होणारा विरोध, सदर प्रकल्पाच्या आखणी मध्ये बदल करताना एंवीरोन्मेन्ट इम्पॅक्ट असेसमेंट मध्ये नमूद केले पाहिजे. सदर महामार्गासाठी नव्याने जमिनी संपादित करण्या ऐवजी अस्तित्वात असलेल्या मुंबई गोवा महामार्गावर उन्नत मार्ग बांधण्यात यावा जेणेकरून पर्यावरणाची हानी होणार नाही. राज्य शासनाच्या दि.६ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयानुसार जर ५०% मोबदला कमी होणार असेल तर शेतकरी जमिनी देणार नाहीत. विकास झाला पाहिजे पण पर्यावरणाचा ह्रास होता काम नये असेही नमूद केले. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी व शासनाने या मुद्द्यांचा विचार करावा असे विदित केले. | श्रीमती पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी यांनी प्रकल्प प्रवर्तकांना श्री गजानन पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत उत्तर द्यावे असे सूचित केले.<br><br>**श्री देशमुख, अधिक्षक अभियंता**- म.रा.र.वि.महामंडळ,यांनी उत्तरादाखल असे सांगितले कि, श्री पाटील यांनी विशद केलेल्या मुद्द्यांबाबत आम्ही नोंद घेतलेली आहे. आपण आपले लेखी निवेदन आम्हाला सादर करावे, जेणेकरून आम्ही आपल्या निवेदनाचा पर्यावरण तज्ञामार्फत अभ्यास करून योग्य ती उपाययोजना करण्यात येईल असे आश्वासित केले. |

| | | |
|---|---|---|
| २ | **श्री जगन्नाथ पाटील - कोले गाव येथी रहिवासी** यांनी विषद केले कि, त्यांची ७ एकर जमीन असून आम्हाला कुठलीही नोटीस, पूर्व सूचना न देता सदर जमीन संपादन करण्याची प्रक्रिया केली जात आहे. आम्ही विकासासाठी जमीन द्यायला तयार आहोत, पण आम्हाला पूर्व सूचना का दिली गेली नाही याची चौकशी करण्यात यावी. आमच्यावर खोट्या केसेस करण्यात आल्या व शिक्षा भोगावी लागली. आम्ही विकास कामासाठी जमीन द्यायला नकार देत नाही, पण जमीन संपादित केल्या नंतर आमच्या निवासाचा पण प्रश्न निर्माण होणार आहे तेव्हा, आमची जमीन संपादित केल्यानंतर आम्हाला किती मोबदला देण्यात येणार आहे व आमच्या पुनर्वसनाचा प्रश्न कसा सोडवणार आहेत हे स्पष्ट करण्यात यावे. | **श्री देशमुख, अधिक्षक अभियंता-** म.रा.र.वि.महामंडळ, यांनी स्पष्ट केले कि, आजची जनसुनावणी ही पर्यावरणाशी संबंधित विषयाबाबत आहे. सदर विषय पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या अखत्यारीत येत नाही. |
| ३ | **श्री हनुमान चौधरी - कटई गावाचे रहिवासी** यांनी असे विषद केले की, सदर रस्ते प्रकल्पाचे संरेखान २०१२ साली करताना, मोकळ्या जागांचा विचार न करता शेतक-यांच्या जमिनीवर आरक्षण केले गेले. त्यावेळी प्रीमियर कंपनीची जागा रिकामी असताना त्या जमिनीवर आरक्षण केले असते तर शेतकरी भूमिहीन झाले नसते तसेच पर्यावरणाचे रक्षणही झाले असते. आता शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्या-ऐवजी जो जुना मुंबई पुणे हायवे आहे याला समांतर रस्ता जर बांधन्याचा विचार केला तर आर्थिक बचत झाली असती या शेतक-यांच्या जमिनीही वाचल्या असत्या. हि जनसुनावणी जर पार्यावरण विषयक आहे तर शेत जमिनी हा सुद्धा पर्यावरणाचं भाग आहे हे लक्षात घ्यावे. | **श्री देशमुख, अधिक्षक अभियंता-** म.रा.र.वि.महामंडळ, यांनी स्पष्ट केले कि, आजची जनसुनावणी ही पर्यावरणाशी संबंधित विषयाबाबत आहे. सदर विषय पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या अखत्यारीत येत नाही. |

श्रीमती पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी यांनी व्हीडिओ कॉन्फरसिंग द्वारा संपर्क साधला आहे त्यांना आवाहन केले कि, त्यांना या प्रकल्पा बाबत पर्यावरण संबंधित काही हरकती , सूचना, असतील तर त्यांनी सादर कराव्यात. परंतु संपर्कातील कुणीही आपले म्हणणे मांडले नाहीत. त्यानंतर -

| अ.क्र. | प्रश्नकर्त्याचे नाव, पत्ता व व्यक्त केलेले मत | प्रकल्प प्रवर्तकाचा अभिप्राय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ४ | **श्री सागर मढवी- उसाटने गावातील रहिवासी** यांनी असे विषद केले की, सदरच्या प्रकल्पामुळे माझी जमीन तसेच माझे राहते घर सुद्धा बाधित होते ज्यामुळे मी बेघर व भूमीहीन होणार आहे तसेच याचा परिणाम माझ्या व्यवसायावर होणार आहे. तरी माझ्या निवाससंदर्भात व माझ्या व्यवसायासाठी काय सोय करणार आहेत याचे स्पष्टीकरण करावे. | **श्री देशमुख, अधिक्षक अभियंता-** म.रा.र.वि.महामंडळ, यांनी स्पष्ट केले कि, आजची जनसुनावणी ही पर्यावरणाशी संबंधित विषयाबाबत आहे. सदर विषय पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या अखत्यारीत येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५ | **श्री रामदास चौधरी - कटई गावाचे रहिवासी**<br>यांनी अशी तक्रार केली कि, जर हि जनसुनावणी पर्यावरण संबधी आहे तर शासनाने श्री मलंग हे धार्मिक स्थळ आहे तसेच बाजूला कुशी धरण आहे असे असताना धार्मिक स्थळ व धरणाच्या जवळ तुम्ही डम्पिंग ग्राउंड कोणत्या निकषावर मंजूर केले आहे? सदरच्या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित केल्या जातात परंतु मोठ्या विकासकांच्या जमीनी का संपादित केल्या जात नाहीत. लोढा सारखे विकासक त्यांच्या मोठ्या गृह निर्माण प्रकल्पातील सांडपाणी नदीत सोडतात त्या जल प्रदूषण करतात. या सारख्या प्रकल्पामुळे धुळीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होते. त्यांच्यावर का कारवाई केली जात नाही. सदरच्या प्रकल्पसाठी शेतक-यांच्या जमिनी संपादित करून शेतकऱ्यांना उध्वस्त केले जाते व मोठ्या विकासकाचे हित साधले जाते असा आक्षेप त्यांनी नोंदवला. शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यापूर्वी त्यांच्या जमिनीची किंमत प्रथम ठरवावी तसेच या प्रकल्पा साठी मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होणार आहे यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. | **श्री देशमुख, अधिक्षक अभियंता-** म.रा.र.वि.महामंडळ-यांनी उत्तरादाखल असे नमूद केले कि, आम्ही तुमच्या भावनांचा आदर करतो, परंतु सदरची जनसुनावणी हि केवळ विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्प या पर्यावरणावर होणा-या परिणामांबाबत आहे त्यामुळे त्या व्यतिरिक्त इतर विषयांवर भाष्य करता येणार नाही. वृक्ष तोंडी संदर्भात आम्ही विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे प्रस्तावित केलेले आहे तसेच धूळ प्रदूषण रोखण्या साठी आम्ही केलेल्या उपाय योजनांची माहिती आम्ही आमच्या सादरीकरणात दिलेली आहे. प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामासंदर्भात केलेल्या उपाय योजनांची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर करावी लागते हा प्रकल्प सुरु असताना व प्रकल्प पूर्ण झाल्यावर सुद्धा आम्ही प्रदूषण नियंत्रणा बाबत योग्य उपाय योजना करणार आहोत व ते वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण महामंडळास अवगत करण्यात येईल. |

**श्री अभिजीत भांडे पाटील -उप विभागिय दंडाधिकारी, कल्याण व अध्यक्ष, जन सुनावणी समिती** – यांनी जन सुनावणीचा समारोप करताना विषद केले कि, सदर प्रकल्पा करीता भूसंपादन संदर्भात आपल्या सूचना आम्ही समजून घेतल्या आहेत तसेच सदरचा प्रकल्प हा नवीन नसून जुनाच प्रकल्प आहे जो पूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सोपविलेला होता तो आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सुपूर्द केलेला आहे. सदर प्रकल्पाचा मुख्य उद्देश हा सध्याचा मुंबई - पुणे महामार्गावर येणारा वाहतुकीचा भार लक्षात घेऊन या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सोय व वाहतुकीवर येणारा ताण हलका करण्यासाठी आहे. भूसंपादन संदर्भात तुम्हाला कुठल्याही समस्या असतील तर तुम्ही मला माझ्या कार्यालयात भेटून तुमच्या समस्या मांडाव्यात, मी तुमच्या समस्या बाबत सर्वतोपरी तुम्हाला साहाय्य करेन. उदाहरणा दाखल त्यांनी श्री गजानन पाटील यांनी कल्याण-शीळ रस्त्या संदर्भात, त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सदरचे भूसंपादन कसे बदलावे लागले हे सांगितले. तुम्ही जर तुमची बाजू योग्यरित्या मांडली आणि योग्य पाठपुरावा केला तर समस्या सुटू शकते हे लक्षात आणून दिले. त्यांनी पुढे अजून काही समस्या पर्यावरण संबंधी या प्रकल्प संदर्भात आहेत का अशी विचारणा केली, परंतु कुठलीही सूचना आल्या नाहीत.

## निष्कर्ष :

जनसुनावणी मध्ये लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, प्रकल्प बाधित शेतकरी, व्यवसाईक सहभागी झाले आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा आणि आक्षेप व्यक्त केले. अध्यक्ष व जनसुनावणी समिती सदस्य व प्रकल्प प्रवर्तक यांनी लोकप्रतिनिधी व गावकरी यांचे पर्यावरण विषयक बाबीचा विरोध, सुचना व अपेक्षा इत्यादी बाबतची नोंद घेत असल्याचे नमूद केले. जनसुनावणीचा समारोप करताना श्री भांडे पाटील यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी समन्वयाने आजच्या जन सुनावणी दरम्यान आलेल्या सूचना लक्षात घेऊन कार्यवाही करावी असे सूचित केले. अध्यक्षांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना जनसुनावणीचे इतिवृत्त तयार करण्यास सुचना दिल्या आणि सर्व संबंधित अधिका-यांना ते पुरविण्यास सांगितले. **जन सुनावणी समिती अध्यक्ष** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहिर केले.

| | | | |
|---|---|---|---|
| **(श्रीमती. सौजन्या पाटील )** | **(श्री. संजय भोसले)** | **(श्री. शं.ल. वाघमारे)** | **(श्री अभिजीत भांडे पाटील)** |
| निमंत्रक | निमंत्रक | सदस्य | अध्यक्ष |
| पर्यावरण विषयक जनसुनावणी | पर्यावरण विषयक जनसुनावणी | पर्यावरण विषयक जनसुनावणी | पर्यावरण विषयक जनसुनावणी |
| तथा, | तथा, | तथा, | तथा |
| उप-प्रादेशिक अधिकारी, | उप-प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी | उप विभागीय दंडाधिकारी, कल्याण |
| मप्रनि मंडळ, भिवंडी | मप्रनि मंडळ, कल्याण-१ | मप्रनि मंडळ, कल्याण | |